प्रस्तावना

विषय :- नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तदतुर्दीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क) ९०, ३१९ अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा. आयुक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजुर झाला आहे. त्यामध्ये प्राथमिक शिक्षण विभागासाठी नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षामधील निधी रु. १०.०० लाख शिल्लक आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शाळांमध्ये नविन शालेय उपक्रमांतर्गत **शिक्षण करुया सोपे अर्थात हसत खेळत शिक्षण** हा उपक्रम महानगरपालिकेच्या इयत्ता पाचवी ते सातवीच्या हिंदी व मराठी माध्यामासाठी राबविण्यासाठी नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षामधील निधी १० लक्ष हा पुरेसा नाही. सदर लेखाशिर्षामध्ये वाढीव रकमेचे पुर्नविनियोजन करणे गरजेचे आहे.

नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षामधील तरतुद-

| लेखाशिर्षाचे नाव | २०२४-२५ तरतूद | दि.०५/०८/२०२४ पर्यंत नोंदविलेली तरतूद | दि.०५/०८/२०२४ पर्यंत शिल्लक तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|
| नविन शालेय उपक्रम | १०.०० लक्ष | ००.०० | १०.०० लक्ष | |

**शिक्षण करुया सोपे अर्थात हसत खेळत शिक्षण या उपक्रमासाठी आवश्यक तरतुद**

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| **शिक्षण करुया सोपे अर्थात हसत खेळत शिक्षण** | २१,७७,००० | नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षामधील निधी १० लक्ष हा पुरेसा नाही. |

तरी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शाळांमध्ये नविन शालेय उपक्रमांतर्गत **शिक्षण करुया सोपे अर्थात हसत खेळत शिक्षण** हा उपक्रम महानगरपालिकेच्या इयत्ता पाचवी ते सातवीच्या हिंदी व मराठी माध्यामासाठी राबविण्यासाठी उर्वरित लागणारी तरतूद त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण या लेखाशिर्षामधून रु. ११.८० लाख प्राथमिक शिक्षण विभागाला पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण या लेखाशिर्षातुन नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षामध्ये केलेले पुर्नविनियोजन

| लेखाशिर्षाचे नाव | २०२४-२५ तरतूद | दि.०५/०८/२०२४ पर्यंत नोंदविलेली तरतूद | दि.०५/०८/२०२४ पर्यंत शिल्लक तरतूद | पुर्नविनियोजना करीता द्यावयाची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण | ५०.०० लक्ष | ००.०० | ५०.०० लक्ष | ११.८० लक्ष | |

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शाळांमध्ये नविन शालेय उपक्रमांतर्गत **शिक्षण करुया सोपे अर्थात हसत खेळत शिक्षण** हा उपक्रम महानगरपालिकेच्या इयत्ता पाचवी ते सातवीच्या हिंदी व मराठी माध्यामासाठी राबविण्यासाठी नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षामधील निधी १० लक्ष हा पुरेसा नाही. अनुषंगाने प्राथमिक शिक्षण विभागातील शाळांमध्ये नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षांतर्गत वाढीव तरतूद त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण या लेखाशिर्षामधून रु.११.७० लक्ष रुपयांचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.सबब पुर्नविनियोजन करण्यासाठी मा. शहर अभियंता यांना मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर कामाकरीता मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.२३/०८/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२, कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखाद्या लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रकमांचा उपयोग करुन भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने मा.स्थायी समितस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्याकडे निहीत आहेत. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. ४९८ दिनांक - २९/०८/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शाळांमध्ये नविन शालेय उपक्रमांतर्गत **शिक्षण करुया सोपे अर्थात हसत खेळत शिक्षण** हा उपक्रम महानगरपालिकेच्या इयत्ता पाचवी ते सातवीच्या हिंदी व मराठी माध्यामासाठी राबविण्यासाठी रक्कम रुपये २१.७७ लक्ष निधीची आवश्यकता आहे. सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजुर झाला आहे त्यामध्ये प्राथमिक शिक्षण विभागासाठी नविन शालेय उपक्रम या लेखाशिर्षामधील निधी रु. १०.०० लक्ष शिल्लक आहे. उर्वरित लागणारी तरतूद बांधकाम विभागाकडील त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण या लेखाशिर्षामधून रु. ११.८० लाख प्राथमिक शिक्षण विभागाला पुर्नविनियोजन करावयाचे आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग)नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

२९/८/२४